1061

Maharashtra State Board of
Secondary & Higher Secondary Education, Pune
S.R.No.832-A, Final Pl No. 178,179, Near Balchitrawani, Behind Agharkar Research Institute, Bhamburda, Shivajinagar, Pune-411004.

महाराष्ट्र राज्य
माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे
स.न.८३२-ए, फा.प्लॉ.नं.१७८,१७९,बालचित्रवाणी शेजारी,आघारकर रिसर्च इन्स्टिट्यूटच्या मागे, भांबुर्डा, शिवाजीनगर, पुणे ४११००४

E-Mail- secretary .stateboard @ gmail.com
Tel : Chairman (p) : STD . (020)-25651751 | EPABX -25705000 Secretary(P) : STD . (020)- 25651750

क्र.रा.म./परीक्षा-२/५९८८
दिनांक-२७/८/२०२१

प्रति,

विभागीय सचिव,
महाराष्ट्र राज्य माध्यमिक व
उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ
सर्व विभागीय मंडळे

विषय:-सन २०२१ मध्ये घेण्यात येणाऱ्या उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२ वी) व माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ.१० वी) पुरवणी परीक्षेसाठी प्रविष्ट होणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी अभ्यासक्रमानुसार देण्यात येणाऱ्या प्रश्नपत्रिकांबाबत.

उपरोक्त विषयास अनुसरुन कळविण्यात येते की, सन २०२१ मध्ये घेण्यात येणाऱ्या उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२ वी) व माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ.१० वी) पुरवणी परीक्षेसाठी प्रविष्ट होणाऱ्या पुनर्परिक्षार्थी व श्रेणीसुधार विद्यार्थ्यांसाठी पुनर्रचित व जुन्या अभ्यासक्रमानुसार देण्यात येणाऱ्या प्रश्नपत्रिकांबाबत दिनांक १३/८/२०२१ रोजी झालेल्या परीक्षा समितीमध्ये चर्चा होऊन पारित झालेल्या ठरावानुसार पुढीलप्रमाणे कार्यवाही करण्यात येत आहे.

**माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ.१० वी) परीक्षा**

माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ.१० वी) सन २०२१ च्या पुरवणी परीक्षेस प्रविष्ट होणाऱ्या सर्व नियमित पुनर्परिक्षार्थी, यापूर्वी नाव नोंदणी प्रमाणपत्र प्राप्त झालेले खाजगी विद्यार्थी, श्रेणी सुधार व तुरळक विषय घेऊन प्रविष्ट होणारे परिक्षार्थी तसेच ITI परिक्षार्थी (औद्योगिक प्रशिक्षण संस्थद्वारे Transfer of Credit घेणारे विद्यार्थी) यांना ७५% अभ्यासक्रमानुसार प्रश्नपत्रिका देण्यात याव्यात.

**उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२ वी) परीक्षा -पुनर्रचित अभ्यासक्रम**

उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२ वी) परीक्षा सन २०२१ च्या मुख्य परीक्षेस नियमित विद्यार्थी म्हणून प्रविष्ट झालेल्या व सन २०२१ च्या पुरवणी परीक्षेस प्रविष्ट होणाऱ्या सर्व नियमित, पुनर्परिक्षार्थी, श्रेणी सुधार व तुरळक विषय घेऊन प्रविष्ट होणारे परिक्षार्थी तसेच ITI परिक्षार्थी (औद्योगिक प्रशिक्षण संस्थद्वारे Transfer of Credit घेणारे विद्यार्थी) यांना ७५% अभ्यासक्रमानुसार प्रश्नपत्रिका देण्यात याव्यात.

**उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२ वी) परीक्षा -जुना अभ्यासक्रम**

उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२ वी) सन २०२१ च्या पुरवणी परीक्षेस प्रविष्ट होणारे सन २०२०-२१ पूर्वीचे सर्व नियमित, पुनर्परिक्षार्थी व श्रेणी सुधार परिक्षार्थी यांना जुन्या अभ्यासक्रमानुसार १००% अभ्यासक्रमावर आधारित प्रश्नपत्रिका देण्यात याव्यात व सदर विद्यार्थ्यांसाठी ही ३ री व अंतिम संधी देण्यात यावी.

तरी सन २०२१ मध्ये घेण्यात येणाऱ्या उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२ वी) व माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ.१० वी) पुरवणी परीक्षेसाठी प्रविष्ट होणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी अभ्यासक्रमानुसार देण्यात येणाऱ्या प्रश्नपत्रिकांबाबत व तिसऱ्या संधीबाबत आपल्या कार्यकक्षेत येणाऱ्या माध्यमिक शाळा, उच्च माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालय यांना अवगत करुन देण्यात यावे.

(डॉ.अशोक भोसले)
सचिव
राज्यमंडळ पुणे

क्र.कोविम/उ.मा.गोप.प्रात्य/
दिनांक ०१/०९/२०२१

प्रति,

प्राचार्य/मुख्याध्यापक.

सर्व मान्यताप्राप्त शाळा/कनिष्ठ महाविद्यालये, सातारा, सांगली, कोल्हापूर.

सन २०२१ मध्ये घेण्यात येणा-या उच्च माध्यमीक प्रमाणपत्र (इ.१२वी) व माध्यमिक शालांत प्रमाणपत्र (इ.१०वी) पुरवणी परीक्षेसाठी प्रविष्ट होणा-या विद्यार्थ्यांसाठी अभ्यासक्रमानुसार देण्यात येणा-या प्रश्नपत्रिकांबाबत वरीलप्रमाणे उचित कार्यावाही करण्यात यावी.

(देविदास कुलाळ)
विभागीय सचिव,
कोल्हापूर विभागीय मंडळ, कोल्हापूर